ePaper
‖ वर्ष - 7 । अंक - 314 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | रविवार, दिनांक 5 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# जे माझ्या शिवसेनेला नकली म्हणतात ते बेअकली: उद्धव ठाकरे




## आतील पानांत


- मुंबई इंडियन्सला मोठा धक्का!
- मृणाल ठाकूरचा साधेपणा
- कांद्यावरील निर्यातबंदी अखेर हटवली!
- मोदी पंतप्रधान झाल्यास हुकूमशाही


## आत्मनिर्भर भारत योजनेलाही गालबोट

# भविष्य निर्वाह निधीचा अपहार!

### बनावट कागदपत्राद्वारे नऊ कोटींचा गैरव्यवहार

। पुणे । महाईन्यूज

**बनावट कागदपत्रांद्वारे ८९ कंपन्यांची स्थापना करून आत्मनिर्भर भारत योजनेतील कामगारांच्या नावे केंद्र शासनाकडून जमा करण्यात आलेला नऊ कोटी ५६ लाख रुपयांच्या भविष्य निर्वाह निधीचा अपहार करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ८९ कंपन्यांची स्थापना करण्यासाठी निरनिराळी नावे, पत्ते आणि एकच मोबाइल क्रमांक दिल्याचे आढळून आले आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली असून, पोलिसांकडून या प्रकरणाचा तांत्रिक तपास सुरू करण्यात आला आहे.**




भविष्य निर्वाह निधी कार्यालयातील अधिकारी मनोजकुमार असरानी (वय ४५) यांनी या प्रकरणी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. केंद्र शासनाच्या आत्मनिर्भर भारत रोजगार योजनेचा लाभ घेण्यासाठी कंपन्यांची तपशीलवार माहिती, कामगारांची संख्या आणि त्यांच्या नावांची तपशीलवार नोंद करावी लागते. त्यानंतर कंपनी आणि सरकारकडून दरमहा ठराविक रक्कम कामगारांच्या नावाने जमा केली जाते. गेले चार वर्षे एकाच व्यक्तीने बनावट कागदपत्रांच्याआधारे ८९ कंपन्यांची नोंद केली असल्याचा प्रकार भविष्य निर्वाह कार्यालयातील अधिकारी राहुल कोकाटे यांच्या निदर्शनास आला. कंपनी आणि कामगारांची नावे असलेली बनावट कागदपत्रे भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे सादर करण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडून पोलिसांकडे तक्रार देण्यात आली. अशा पद्धतीने फसवणुकीचे आणखी काही प्रकार घडल्याचा संशय आहे. भविष्य निर्वाग निधी कार्यालयाकडून याप्रकरणी अंतर्गत चौकशी सुरू करण्यात आली आहे. वानवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पतंगे यांच्या मार्गदर्शाखाली सहायक पोलीस निरीक्षक दत्तप्रसाद शेंडगे तपास करत आहेत.

### 24 महिन्यांसाठी योजना लागू




भविष्य निर्वाह निधी संघटन, श्रम आणि रोजगार मंत्रालयाकडून आत्मनिर्भर भारत रोजगार योजनेअंतर्गत करोना संसर्ग काळात ज्यांची नोकरी गेली आहे किंवा ज्यांना काम मिळाले नाही. अशा श्रमजीवींना खासगी कंपनीने काम दिल्यास त्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम केंद्र सरकार भरणार, अशी योजना मांडण्यात आली होती. रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात असा या योजनेचा मुख्य उद्देश होता. ३१ डिसेंबर २०२० रोजी ही योजना लागू करण्यात आली होती. कामगारांच्या वेतनातून कापण्यात येणारी १२ टक्के रकम सरकार भरणार होते. उर्वरित १२ टक्के रक्कम कंपनीकडून भरण्यात येणार होती. ही योजना २४ महिन्यांसाठी लागू करण्यात आली होती.

## माथेरानच्या पर्यटन विकासाला मोदी सरकारमुळे चालना!

### खासदार श्रीरंग बारणे : टॉय ट्रेन पुन्हा सुरू करण्यासाठी दिला 150 कोटींचा निधी

। माथेरान । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माथेरान येथील पर्यटन विकासाला केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारमुळे मोठी चालना मिळाली आहे. यापुढेही माथेरानच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.**



शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीच्या वतीने माथेरान येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रचार सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर आमदार महेंद्र थोरवे, शिवसेना संपर्कप्रमुख विजय पाटील, जिल्हाप्रमुख संतोष भोईर, उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, तालुकाप्रमुख संभाजी जगताप आदी पदाधिकारी होते.

खासदार बारणे म्हणाले की, माथेरान हे जागतिक कीर्तीचे थंड हवेचे ठिकाण आहे. माथेरानची पूर्ण अर्थव्यवस्था पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहे. त्यामुळे माथेरानमधील पर्यटन विकासाला मोदी सरकारने नेहमीच प्राधान्य दिले आहे. पर्यटकांचे विशेष आकर्षण असलेली टॉय ट्रेन बंद करण्यात आली होती. ती पुन्हा सुरू व्हावी यासाठी आपण पाठपुरावा करून केंद्र शासनाकडून दीडशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला.

### खासदार बारणे यांचे स्वागत व सत्कार

केंद्र शासन व राज्य शासनाच्या माध्यमातून माथेरानच्या विकासासाठी यापुढेही अधिकाधिक निधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली. माथेरानमधील रहिवासी आणि व्यावसायिक यांनी खासदार बारणे यांचे स्वागत व सत्कार केला. निवडणुकीत बारणे यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

# भाजपाविरोधी मतांचे विभाजन होणार!

# पुण्यात ‘एमआयएम’ शक्तीप्रदर्शन करणार!

## लोकसभा निवडणूक रणसंग्राम: महायुतीची ‘मुरली’ सुसाट; धंगेकर, मोरे कोमात!






| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**‘राज्यात ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लीमीन अर्थात ‘एमआयएम’च्या विस्तारावर लक्ष केंद्रित करण्यात आले असून, विधानसभा आणि महापालिका निवडणुकांत पक्षाची शहरातील ताकद दिसेल,’ असा दावा पुणे लोकसभा मतदारसंघातील ‘एमआयएम’चे उमेदवार अनीस सुंडके यांनी केला आहे.**

विशेष म्हणजे, सुंडके यांच्या प्रचारासाठी ‘एमआयएम’चे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांची ७ मे रोजी पुण्यात सभा आयोजित करण्यात आली आहे, असेही त्यांनी नमूद केले. सभेचे ठिकाण मात्र अद्याप निश्चित करण्यात आलेले नाही. या सभेमुळे भाजपाविरोधी मतांचे विभाजन होईल आणि महायुतीला फायदा होईल, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.सुंडके यांनी पुण्यातील एका अग्रेसर वृत्तपत्राच्या कार्यालयास भेट दिली. त्या वेळी त्यांनी संवाद साधला. ते म्हणाले, की विधानसभा, महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आतापासून काम सुरू केले आहे. पुणे शहरात ‘एमआयएम’चा एक आमदार आणि महापालिकेत ३० नगरसेवक निवडून आणण्याचे उद्दिष्ट आहे. त्या दृष्टीने मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांशी आतापासून संवाद साधण्यास सुरुवात केली आहे, असेही सुंडके यांनी म्हटले आहे.पुणे लोकसभा मतदार संघात भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी-आरपीआय व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून मुरलीधर मोहोळ मैदानात आहेत. काँग्रेस-राष्ट्रवादी शरद पवार आणि शिवसेना उबाठा व घटक पक्ष महाविकास आघाडीकडून रविंद्र धंगेकर आणि वंचित बहुजन आघाडीकडून वसंत मोरे आमने-सामने आहेत. त्यामुळे ही निवडणूक त्रिशंकू होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेनंतर पुण्यातील वातावरण महायुतीच्या बाजुने झुकले होते. त्यानंतर शुक्रवारी काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी सभा घेतली. या सभेलाही पुणेकरांनी प्रतिसाद दिला. त्यामुळे महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना चुरशीचा होईल, असा दावा केला जातो.

दरम्यान, भाजपा विरोधी वंचित बहुजन आघाडी आणि एमआयएम या दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे उमेदवार दिल्यामुळे काँग्रेस तथा महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांना फटका बसणार आहे. बहुसंख्य मुस्लीम मतदार हा काँग्रेसला मतदान करण्यास प्राधान्य देतो, असे निरीक्षण आहे. पण, ‘एमआयएम’च्या एन्ट्रीमुळे त्यावर परिणाम होणार आहे. वंचितचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांना मानणारा अल्पसंख्याक आणि मागासवर्गीय समाज हा मोठ्या प्रमाणात वसंत मोरे यांच्या पारड्यात मतदान टाकाणार आहे.

त्यामुळे त्याचा थेट परिणाम काँग्रेसच्या उमेदवारावर होईल, असेही राजकीय जाणकारांचा दावा आहे.

### आरक्षणाचा मुद्दा “बुमरँग”

काँग्रेस सत्तेत आल्यानंतर राज्यातील मराठा आणि धनगर आरक्षणाचा प्रश्न कायमस्वरुपी सोडवला जाईल, असा दावा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला. मात्र, देशातील आणि राज्यातील राजकारणात ६० वर्षे सत्तेत असलेल्या काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसला हा मुद्दा सोडवता आला नाही. किंबहुना, महाविकास आघाडीची राज्यात सत्ता असताना मराठा-धनगर आरक्षणाचा निर्णय घेत हा विषय ‘क्रेडिट’ करण्याची संधी होती. मात्र, महाविकास आघाडीचे सर्वेसर्वा शरद पवार किंवा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याबाबत ठाम भूमिका घेतली नाही. यासह मराठा आरक्षणाचे आश्वासन म्हणून ‘ओबीसी’ समाजाला डिवचल्याचा प्रकार आहे. पुणे लोकसभा मतदार संघात ओबीसी समाज निर्णायक आहे. तसेच, अनुसूचित जाती-जमातीच्या मतदारांमध्येही सर्वसाधारण गटातील समाजाला आरक्षण देण्याच्या भूमिकेला अप्रत्यक्ष विरोध आहे. परिणामी, मराठा आणि धनगर आरक्षणाच्या आश्वासनाचे ‘गाजर’ दाखवण्याचा मुद्दा काँग्रेससाठी ‘बुमरँग’ होण्याची शक्यता सर्वाधिक आहे.

---

# आता मतदार त्यांना धडा शिकवतील!

## शिवाजीराव आढळराव पाटील यांची डॉ. अमोल कोल्हेंवर टीका



| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**शिरूर लोकसभा मतदार संघात प्रचाराणे वेग घेतला आहे. या मतदारसंघात वैयक्तिक आरोप – प्रत्यारोपांच्या फैरी झडताना दिसत आहेत. खासदारकीचा मधूनच राजीनामा द्यायची घाईपण आणि निवडणूक आल्यावर ती लढविण्याची हौसपण आणि आता निवडणुकीसाठी बाळसंही आलं, असं वागून मतदारांना गृहीत धरण्याचा प्रकार डॉ. अमोल कोल्हेंकडून सुरू आहे.**

आता मतदार त्यांना धडा शिकवतील, असे प्रतिपादन महायुतीचे शिरूरचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी चाकण येथे केले.शिरूर लोकसभेसाठी मनसेच्या वतीने चाकणच्या आंबेठाण चौकात मेळावा झाला. या वेळी आमदार दिलीप मोहिते पाटील, मनसे नेते राजेंद्र बाबू वागस्कर, शिवसेना उपनेते इरफान सय्यद, भाजपचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील, मनसे जिल्हाध्यक्ष समीर थिगळे, जिल्हाध्यक्ष मकरंद पाटे, सरचिटणीस अजय शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष युवा मोर्चा प्रिया पवार, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर, भाजपचे तालुकाध्यक्ष शांताराम भोसले, राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष जयसिंग दरेकर, सभापती कैलास लिभोरे, पुणे जिल्हाध्यक्ष रामदास दरेकर, सचिन चिखले, संदीप पवार, मनोज पडवळ आदी कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, मनसैनिक शिरूर लोकसभेत तन-मन-धनाने जिवाचं रान करून आढळरावांसाठी मतदान करून घेण्यासाठी लोकांमध्ये प्रचार करत आहेत. पिंपरीसाठी माजी नगरसेवक सचिन चिखले, हडपसरमध्ये साईनाथ बाबर, हवेलीची धुरा किरण माने, चेतन चौधरी, शिरूरची धुरा रवी मुरादे, नाना लांडे, किरण गव्हाणे, आंबेगावची धुरा बाबू बाणखेले, आशिष शिंदे, किरण गव्हाणे, खेडची धुरा मंगेश सावंत, सनी लोणकर, नवनाथ लोखंडे सांभाळत आहेत. विद्यार्थी सेनेचा ३०० मनसैनिकांचा मेळावा खेड तालुक्यात झाला आहे. शिरूर, हवेली, जुन्नर, आंबेगाव, खेड-आळंदी या सर्वच भागातले मनसैनिक आढळरावांच्या प्रचारासाठी तळागाळातल्या मतदारांपर्यंत पोहोचत आहेत, अशी माहिती विद्यानंद मानकर यांनी दिली.

### यांची होती उपस्थिती

.शिरूर लोकसभेसाठी मनसेच्या वतीने चाकणच्या आंबेठाण चौकात मेळावा झाला. या वेळी आमदार दिलीप मोहिते पाटील, मनसे नेते राजेंद्र बाबू वागस्कर, शिवसेना उपनेते इरफान सय्यद, भाजपचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील, मनसे जिल्हाध्यक्ष समीर थिगळे, जिल्हाध्यक्ष मकरंद पाटे, सरचिटणीस अजय शिंदे, प्रदेश उपाध्यक्ष युवा मोर्चा प्रिया पवार, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर, भाजपचे तालुकाध्यक्ष शांताराम भोसले, राष्ट्रवादी युवकचे तालुकाध्यक्ष जयसिंग दरेकर, सभापती कैलास लिभोरे, पुणे जिल्हाध्यक्ष रामदास दरेकर, सचिन चिखले, संदीप पवार, मनोज पडवळ आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### कांदा निर्यातबंदी वरुन कोल्हेंना पोटशूळ

शिरूर लोकसभा मतदारसंघात सामान्य जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याबरोबरच वैयक्तिक आरोप – प्रत्यारोपांना प्राधान्य दिले जात असल्याचे दिसत आहे. सरकारने आता कांद्याची निर्यातबंदी उठवली. त्यामुळे तीन महिन्यांपासून कांदा कांदा ओरड करणाऱ्या डॉ. अमोल कोल्हेंचा हा मुद्दाच सरकारने हिरावून घेतल्याने कोल्हेंना पोटशूळ उठला आहे. त्यामुळे ते सैरभैर होऊन, देशाच्या संरक्षण खात्याच्या गुप्ततेविषयी पोरकट भाष्य करू लागले आहेत, असा पलटवार महायुतीचे शिरूरचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी कोल्हेंवर केला आहे.

# पुण्यात प्राणांतिक अपघातांमध्ये घट!

## पहिल्या दहा क्रमांकामध्ये असणारे पुणे ३९व्या क्रमांकावर

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील अपघातांमध्ये वाढ होत असताना पुणे शहर व जिल्ह्यातील प्राणांतिक अपघात कमी करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश आल्याचे दिसून येत आहे. गेल्या तीन महिन्यांत पुणे शहर व ग्रामीण भागांतील प्राणांतिक अपघातामध्ये मोठी घट झाली आहे. राज्यात प्राणांतिक अपघात होण्यामध्ये कायम पहिल्या दहा क्रमांकामध्ये असणारे पुणे आता ३९व्या क्रमांकावर गेले आहे.**



गेल्या काही वर्षांत पुणे शहर व जिल्ह्यात अपघातांची संख्या सातत्याने वाढतच होती. पुण्यातील अपघात कमी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी रस्ता सुरक्षा समितीची बैठक घेऊन अपघात करण्यासाठी युद्धपातळीवर काम करण्याच्या सूचना दिल्या होत्या. अपघातप्रवण क्षेत्र शोधून उपाययोजना करण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी अपघातप्रवण क्षेत्राच्या ठिकाणी तात्पुरत्या उपाययोजना केल्या. त्यामुळे पुणे शहर व जिल्ह्यातील अपघात कमी होण्यास मदत झाली आहे.

### नागपूरमध्ये प्राणांतिक अपघात वाढले

राज्यात गेल्या तीन महिन्यांच्या अपघातांचा अभ्यास केल्यास नागपूर शहरात प्राणांतिक अपघातामध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे. प्राणांतिक अपघात वाढीमध्ये दुसऱ्या क्रमांकावर जालना आणि तिसऱ्या क्रमांकावर गोंदिया शहर आहे. अपघात कमी करण्याच्या दृष्टीकोनातून हा अभ्यास गोळा करून त्यावर उपाययोजना केल्या जात आहेत.

### अपघात 13 टक्क्यांनी घटले

पुणे शहरात २०२३मध्ये जानेवारी ते मार्च दरम्यान ३०५ अपघात झाले होते. त्यामध्ये १०५ जणांचा मृत्यू झाला होता. या वर्षी जानेवारी ते मार्च दरम्यान ३८२ अपघात झाले आहेत. त्यामध्ये ९२ जणांचा मृत्यू झाला आहे. म्हणजे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पहिल्या तीन महिन्यात प्राणांतिक अपघात १३ टक्क्यांनी घटले आहेत. पुणे ग्राणीममधील अपघातांची संख्या सहा टक्क्यांनी घटली आहे.

### तीन पोलिस ठाण्यांच्या हद्दीत सर्वाधिक अपघात

पुण्यात अद्याप तीन पोलिस ठाण्यांच्या हद्दीत सर्वाधिक अपघात घडत असल्याचे दिसून आले आहे. त्यामध्ये लोणीकंद, लोणीकाळभोर आणि हडपसर या पोलिस ठाण्यांचा समावेश आहे. या पोलिस ठाण्याच्या हद्दीतून दोन महत्त्वाचे महामार्ग जातात. तिथेच अपघात जास्त असून, या ठिकाणी अपघात रोखण्यासाठी काम केल्यास अपघातांची संख्या आणखी कमी होईल.

**“ पुण्यातील अपघात कमी करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रित काम केले. त्यानुसार पुण्यातील प्राणांतिक अपघात कमी झाले आहेत. नागरिकांनी दुचाकी चालवताना हेल्मेट घालावे; तसेच कार चालविताना सीट बेल्ट परिधान करणे आवश्यक आहे. अपघात कमी करण्यासाठी आमचे काम सुरूच राहील.**

**-संजीव भोर, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे**

---

# मराठा आरक्षणाबाबत संसदेत भक्कमपणे बाजू मांडू!

## संजोग वाघेरे पाटील: खोपोलीतील बैठकीत सकल मराठा बांधवांचा पाठिंबा

। खोपोली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**सर्व समाज बांधवांना सोबत घेऊन काम करण्याची भुमिका राजकारण व समाजकारण करताना नेहमीच घेतली आहे. मात्र, मराठा समाजाचा प्रतिनिधी म्हणून समाजासाठी भुमिका घेण्यासाठी मी बांधील आहे. मराठा आरक्षणाबाबत संसदेत भक्कमपणे बाजू मांडण्याचे काम करू. मराठा समाजासोबत सर्वच समाज घटकांना न्याय देवू, असा विश्वास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी दिला.**



खोपोली येथील श्रीराम मंगल कार्यालय या ठिकाणी पार पडलेल्या बैठकीत कर्जत, खालापूर, पनवेल आणि उरणसह रायगड जिल्ह्यातील सकल मराठा समाज बांधवांनी संजोग वाघेरे पाटील यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला सकल मराठा समाजाचे प्रमुख महाराष्ट्र समन्वयक डॉ. सुनील पाटील, विनोद साबळे, शंकरराव थोरवे, गणेश कडू, जिल्हाध्यक्ष मराठा समाज उत्तम भोईर, प्रकाश पालकर, मारुती पाटील, राजेश लाड, भानुदास पालकर, सुरेश बोराडे, नितीन मोरे, अविनाश तावरे, दीपक लाड, किरण हडप, एकनाथ पिंगळे, धनश्री दिवाणे, मंगेश दळवी, रमेश जाधव, मनीष जाधव, अविनाश तावरे, उदय पाटील, उमेश मसे, अशोक सावंत, मनोहर देशमुख यांच्यासह सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. संजोग वाघेरे पाटील पुढे म्हणाले की, समाजाच्या भावना समजून घेण्याची गरज आहे. माझ्यावर प्रेम करणा-या समाजासाठी मला भांडायचं आहे. जोपर्यंत आरक्षणाचा निर्णय होणार नाही. तोपर्यंत खासदार झाल्यानंतर सत्कार आणि हार तुरे स्वीकारणार नाही. तुम्ही टाकलेली जबाबदारी मी स्वीकारली आहे. मी इतरांप्रमाणे रंग बदलणार नाही. मला कामासाठी केव्हाही आदेश द्या. त्या त्या वेळेस मी हजर असेन. मी वाघेरे पाटील शब्दाला पक्का आहे. आपला विश्वास सार्थ करण्यासाठी सदैव आपल्यासोबत असेल. तुमच्या विश्वासाला कुठेही तडा जाऊ देणार नाही. एवढी गॅरंटी देऊ शकतो, असं वाघेरे पाटील आवर्जून म्हणाले. मी माळकरी असून वारकरी संप्रदायात काम करीत आहे. तरुणांसाठी, लोकांसाठी काम करीत आहे. कोणत्याही आर्थिक, सामाजिक संकटात अडकलेल्या कुटुंबाना आणि समाज बांधवांसाठी काम करण्याची तयारी असल्याचे देखील ते म्हणाले.

या बैठकीत आरक्षणाचा मुद्दा आणि समाजाची कशा पद्धतीने फसवणूक सरकारने केली, हे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यावेळी “छत्रपती शिवाजी महाराज की जय”, “एक मराठा लाख मराठा”, “लाख मराठा कोटी मराठा” अशा घोषणा देण्यात आल्या.

### आम्ही ठामपणे वाघेरे यांच्या पाठीशी

या बैठकीत समाजाचे समन्वयक विनोद साबळे म्हणाले की, सकल मराठा समाजाच्या आंदोलनात रायगड जिल्ह्यातील मराठा समाज सातत्याने सहभागी झाला. मतदारसंघात पन्नास ते साठ टक्के मतदान मराठा समाजाचे आहे. या लोकसभेत समाजाची बाजु न घेणा-यांना घरी बसवले पाहिजे. आताच्या खासदारांनी मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत “म” देखील काढलेला नाही. त्या माणसाला समाजाबद्दल काहीच वाटत नाही. मराठा आरक्षणावर आमचे कित्येक वेळा उपोषण झाले मात्र, ते एकदाही फिरकले नाहीत. त्यांना ही ताकद समजली नाही. संजोग वाघेरे पाटील आरक्षणाच्या लढ्याला बळ देणारी भुमिका घेतील, त्यामुळे आम्ही ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली.




# आधुनिक काळातील अशोभनीय बाब !

**ज्यांना लग्नानंतर कितीतरी वर्ष मुलबाळ होत नाही त्यांना विचारा कि पत्नी प्रेग्नंट राहिल्यावर त्यांना किती आनंद होते पण जे पुरुष स्त्रियांची किंमतच करीत नाही त्यांना स्त्रीचे काय मोल असणार . त्यांना लागतो फक्त वंशाला दिवा म्हणजे अजूनही त्यांना मुलाचीच किंमत पण मुलीची माया कधी या लोकांना जाणवलीच नसेल का ? हेच ह्यांच पत्नी प्रेम आहे का ?**

तिला त्रास देण्यात त्यांना नितांत आवड असेल का म्हणूनच मग जेव्हा बायको प्रेग्नेंट राहते मग अशावेळी वेगळे चाळे करायला का सुचतात यांना गर्भलिंग परीक्षण करण्याची गरज का वाटते लाज वाटण्यासारखी गोष्ट आहे केरळ आज गर्भलिंग परीक्षण करणारे प्रत्येक आई-वडिलांनी करावा. आपल्या मुलाला जर सरकारी किंवा कोणती नोकरी नसली तर त्याला बायको मिळेल का ?मग त्याच्या आयुष्याची राख रांगोळी करण्याचा तुम्हाला अधिकाऱ् नाही. एक तर मुलांना नोकरीसाठी खाव्या लागणाऱ्या खस्ता, त्यांचे परिश्रम, मेहनत, त्यांची जिद्द ,त्यांची चिकाटी सर्व पणाला लावावं लागत .आईला जिवंतपणी यातना किती देणार याची कल्पना आहेत का ? उद्या निष्पाप जिवाचा खून मोठ्या हौशेने करताना आपण थोडा सुद्धा आपल्या बायकोचा विचार करत नाही आणि येणारी परिस्थितीचा संभाव्य धोका सुद्धा आपल्याला जाणवत नाही का? हे एक विचार करायला लावणारी गोष्ट उद्या या



मुलांना जर बायका नाही मिळाल्या तर स्त्रियांवर किती अत्याचार वाढणार याची कल्पना किंवा खरोखर जाणीव नाही आपल्या आपल्याला,म्हणून पुन्हा सांगते की सुज्ञ पालकांनी तरी गर्भपात करताना, पत्नीला होणारा त्रास कोवळ्या कळीला खूडतांना सुद्धा स्त्रीवरच अत्याचार आणि एक स्त्री चा बळी म्हणजे तीन स्त्रियांवर अत्याचार याचा कधी तुम्ही विचार केला का एक कळी खुडल्यानंतर तीन स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराची जाणीव आपल्याला नसणारच मग उद्या तोच अत्याचार आपल्या घरच्या स्त्रीवर झाला तर ? असू द्या बलात्कार स्त्रीवर होतो तुमचं काय जाते ना ? तसेही कोणाच्याही दुश्मनी मध्ये किंवा आत्याचारा मध्ये स्त्रीचाच बळी जात जाते एवढं मात्र नक्की , पायाखालची खरोखर जमीन सरकते विचार केला की आताच तर अत्याचाराचे प्रमाण अतोनात वाढते आहे. जरा बलात्काराच्या केसेस बद्दल विचार केला का तर दर तीन मिनिटांनी भारतात एक बलात्कार होतो आणि असेच गर्भपात जर आपण करत राहिलो तर प्रत्येक घरातील स्त्री सुरक्षित राहील का ? जरा तरी विचार करा ना? आज लावलेला आंब्याचे झाड फळ द्यायला एक विशिष्ट वेळ घेतो तसेच मुली जन्माला घातल्याबरोबर त्या लग्नाला येणार नाहीत ना ? आपल्या मुलाचा तरी विचार करा त्याला मुलगी तर मिळेल मिळणार का लग्नासाठी कारण आपल्या करणीचच ते फळ असणार आहे हे मात्र नक्की

आठवते शिवकालीन गोष्ट शिव दरबारात एक सुंदर मुस्लिम स्त्री लढाई झाल्यानंतर आणल्या गेली होती शिवरायांनी त्या स्त्रीची माफी मागून तिची चोळी बांगडी करून सन्मानाने परत पाठवले किती हा स्त्रीचा सन्मान, स्त्रीच्या सन्मानार्थ घडलेले महाभारत मग द्रौपदी वरचे अत्याचार आठवतात ना पण तरीही तिला मान मिळवून देण्यासाठी पांडवांची प्रतिज्ञा,

स्त्री शिक्षणासाठी लोकांचे दगड, शेणाचा मारा खाऊन आपल्या पतीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सावित्रीबाईची धडपड जिच्या संपूर्ण त्यागामुळे सहनशीलतेमुळे स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आघाडीचे,सन्मानाचे स्थान मिळवतात आणखी एका सावित्री ही दंतकथा की तिने सावित्रीने यमाच्या दरबारातून पतीचे प्राण वापस आणले, रामायणातील सीता बघाना गर्भवती असताना पतीने लक्ष्मणाच्या हातून तिला वनात सोडले कुठे असेल त्या सीतेचे मन त्या परिस्थितीत जर सीतेने नकार दिला असता ,ती वापस घरी आली असती किंवा तिने तिथेच भांडण सुरू केले असते तर आज रामाची प्रतिमा मर्यादा पुरुषोत्तमची होता वेगळीच तयार झाली असती म्हणजे इथेही सीतेच्या त्यागाला विसरता कामा नये,तिने साधी कोणाजवळही वाच्यता केली नाही. त्यागमूर्ती रमाबाई बघा कितीच गुण गावे माझ्या रमाईचे कमीच आहेत, आपल्यासमोरच उदाहरण बघा ना पंतप्रधान इंदिरा गांधी कितीतरी वर्षे किती चांगले राज्य चालवले वेळोवेळी भरघोस मतांनी निवडून आल्या निवडणूक चिन्ह किती बदलली तरी निवडून आल्या म्हणजे स्त्रिया जसे उत्तम घर चालू शकतात.

## संपादकीय »

# अधिकारावर गदा!

***खेड्यात राहणाऱ्या पन्नास टक्के प्रजेच्या संपत्तीच्या अधिकारावर गदा आलेली आहे. व्यवसाय स्वातंत्र्य कुंठित झाले आहे.***

फा कमविण्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जात आहे. कष्ट करून,भरपूर पिकवूनही शेती हा तोट्याचा धंदा करावा लागत आहे. कर्जबाजारी झाल्यामुळे सरासरी बारा शेतकरी रोज आत्महत्या करताना आढळत आहेत. हे भयाण वास्तव असले तरी राज्यकर्ते देश महासत्ता होणार असल्याचे स्वप्न प्रजेला दाखवीत आहेत. विश्वगुरू असल्याचा देखावा करीत आहेत ही खरी शोकांतिका आहे. भारत एक प्रजासत्ताक राष्ट्र होऊन ७४ वर्षे झाली आहेत. स्वातंत्र्य दिले आहे. पारतंत्र्यातील गुलामीचे जीवन मागे टाकून स्वराज्यात जनता आनंदी होईल, सुखी होईल, संपन्न होईल व भारत समृद्ध होईल, सर्व भेद नष्ट होऊन समानता प्रस्थापित होईल अशी आशा सामान्य जनतेने बाळगली होती पण राज्यघटना स्वीकारल्याच्या दीड वर्षाच्या आतच राज्यकर्त्यांनी पहिली घटना दुरूस्ती केली व देशातील शेतकऱ्यांच्या संपत्तीचा अधिकार नष्ट केला. ७५ टक्के जनता शेती व्यवसायावर अवलंबून होती.

इंडिया म्हणजेच भारत या एका धर्मनिरपेक्ष देशात सध्या लोकसभा निवडणूक सुरू आहे. आचारसंहिता लागू आहे. अशा या काळात धार्मिक आधारावर मतं मागणं हा आचारसंहितेचा भंग ठरतो आणि तो गंभीर गुन्हा मानला जातो. हा गुन्हा करणाऱ्यांना शिक्षा ठोठावली जाऊ शकते. त्यांना स्वतःची उमेदवारीही गमावावी लागू शकते.

# काँग्रेस सत्तेत येईल वाटतंय का?

तर, नरेंद्र मोदी सलग दहा वर्षं शीर्षस्थानी आहेत. चाय पे चर्चा, मन की बात, परीक्षा पे चर्चा, सर्व स्तरांवरील निवडणुकांच्या प्रचारसभा, परदेश दौऱ्यांतली भाषणं, वरचे वर मुलाखती यातून त्यांच्या वक्तृत्वाचा प्रभाव जनतेवर नेहमीच पडत असतो. दहा वर्षांनंतरही या प्रभावाचा आलेख चढाच आहे. अब की बार चार सौ पारची घोषणाही भाजपने पूर्ण आत्मविश्वासाने दिली आहे. पहिल्या टप्प्यातील मतदानानंतर ती कानी येण्याचं प्रमाण थोडं कमी झालं आहे, हा भाग वेगळा, पण मुद्दा असा की, पंतप्रधानांचं भाषण संपूर्ण देश पूर्ण गांभीर्याने ऐकतो. काही अपरिहार्य कारणांमुळे ऐकता आलं नाही, तरीही थोड्याच वेळात समाजमाध्यमांवर ते व्हायरल होतं. बातम्यांचा, चर्चेचा, ट्रेंडचा आणि विरोधकांच्या टीकेचाही विषय ठरतं. निवडणुकांच्या काळात तर मतदार आपल्या नेत्यांची वक्तव्य फारच बारकाईने ऐकतात. कोण काय आश्वासनं देतंय, कोणती वैचारिक



भूमिका मांडतंय, यावर मतदार आपलं मत कोणाला द्यायचं हे ठरवणार असतात.पण यावेळच्या निवडणुकीत मतदारांना मोदींच्या भाषणांत आश्वासनं कमी आणि इशारेच जास्त ऐकू येऊ लागले आहेत. या इशाऱ्यांचं साधारण स्वरूप असं की काँग्रेस सत्तेत आली, तर तुमच्याकडून अमुक गोष्ट हिरावून घेईल आणि जास्त मुलं जन्माला घालणाऱ्यांमध्ये, त्यांच्या व्होट बँकेमध्ये वाटून टाकेल. एकीकडे चार सौ पारचे दावे केले जात आहेत. विरोधक आहेतच कुठे? मोदी नाही तर कोण... वगैरे प्रश्न विचारून विरोधकांची खिल्ली उडवली जात आहे. असं असताना काँग्रेस सत्तेत येईलच कशी? पण मोदी मात्र दर दाव्याची सुरुवात काँग्रेस सत्तेत आलीया दाव्यांची सुरुवात झाली राजस्थानातल्या बांसवाडा शहरात २१ एप्रिलला झालेल्या प्रचारसभेपासून. नरेंद्र मोदींनी इशारा दिला की 'काँग्रेसचं सरकार स्थापन झालं तर प्रत्येकाच्या मालमत्तेचं सर्वेक्षण केलं जाईल. आपल्या माता-बहिणींकडे किती सोनं आहे, आदिवासींकडे किती चांदी आहे याची तपासणी केली जाईल, हिशेब लावला जाईल आणि हे सोनं आणि बाकीची संपत्ती सर्वांना समप्रमाणात वाटून टाकली जाईल.' मतदारांच्या भावनांना हात घालत मोदी असंही म्हणाले की, 'आपल्या समाजात सोनं हे केवळ दिखाव्यासाठी नसतं, तो महिलांच्या सन्मानाचा मुद्दा असतो. त्यांचं मंगळसूत्र त्यांच्या स्वप्नांचा भाग असतो आणि काँग्रेस आपल्या जाहीरनाम्यात मंगळसूत्र हिसकावून घेण्याची भाषा करत आहे. आधीही त्यांनी म्हटलं होतं की देशाच्या संपत्तीवर पहिला अधिकार मुस्लिमांचा आहे. म्हणजे ते तुमची संपत्ती गोळा करून ज्यांची जास्त मुलं असतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कर दहशतवाद नष्ट करून टाकणार!

## कापसाच्या भावाचे वांदे झाले : उद्धव ठाकरे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवरायांनी स्वराज्य उभे करण्यासाठी गुजरातमध्ये जाऊन त्यावेळी सुरतेवर छापा टाकला. आता त्या गुजरातचे दोघेजण महाराष्ट्र लुटत आहेत. आपण केवळ रडगाणे गात रहायचं नाही. तुम्ही सरकार उलथून टाका मी आपलं सरकार आल्याबरोबर जाचक कायदे रद्द करतो. शेतकरी आणि व्यापारी वर्ग मोदी सरकारने जीएसटीच्या कचाट्यात पकडले आहेत.**




हा कर दहशतवाद आपण नष्ट करून टाकणार असल्याचे आश्वासन उद्धव ठाकरे यांनी धाराशिव येथे दिले.महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ धाराशिव शहरातील जिल्हा परिषद प्रशालेच्या मैदानात आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार कैलास पाटील, माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर, माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील, माजी आमदार राहुल मोटे यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.सोयाबीनला भाव नाही, कापसाच्या भावाचे वांदे झाले आहेत, तर कांदा निर्यातबंदीमुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. केवळ निर्यातबंदी केली आहे असे रडगाणे गात बसण्याला अर्थ नाही. निर्यात बंदी मोडून काढायची असेल तर हे सरकार पाडून टाकायला हवे. तुम्ही हे सरकार उलथवून टाका, कांद्याची निर्यात बंदी कायमची दूर करण्याची जबाबदारी माझी आहे. इंडिया आघाडीचे सरकार देशात येणार आहे. घरगड्याप्रमाणे सगळ्या शासकीय यंत्रणा वापरणाऱ्यांना आपण वठणीवर आणल्याशिवाय राहणार नसल्याचा इशाराही उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिला.नरेंद्र मोदी यांना आपल्याविषयी प्रेम असल्याचे ऐकून आनंद झाला. मलाही त्यांच्याविषयी मनात प्रेम आहे. मात्र ज्यावेळी आपल्यावर शस्त्रक्रिया झाली होती त्यावेळी महाराष्ट्रातील सरकार पाडण्याचे षडयंत्र करणाऱ्या मोदींच्या चेल्याचपाट्यांना या प्रेमाची जाणीव नव्हती का ? असा सवालही ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केला.मशाल चिन्ह घेऊन आपण रणांगणात उतरलो आहोत. आपल्या सगळ्यांचे आशीर्वाद घेऊन मशालीच्या माध्यमातून दिल्लीचे तख्त जाळून टाकल्याशिवाय आपण स्वस्थ राहणार नाही. नरेंद्र मोदी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब यांचे कर्ज मान्य करत असतील तर त्याच बाळासाहेबांच्या खोलीत अमित शहा यांनी दिलेले वचन मोदींना माहीत नव्हते काय ? असा सवालही ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केला.आज मोदींवर गॅरंटी म्हणून महाराष्ट्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात आणि गल्लीबोळात फिरण्याची वेळ आली आहे. तरुणांच्या हाताला रोजगार नाही, शेतकऱ्याच्या मालाला भाव नाही, सर्वांना हक्काचे घर देणार होते तेही खोटे ठरले. त्यामुळे गॅरंटीच्या नावावर खोटे कोण बोलत आहे हे सर्वांना माहीत आहे. त्यामुळेच मी केंद्रातल्या सरकारला मोदी सरकार नव्हे तर गजनी सरकार म्हणून संबोधतो, कारण मागील निवडणुकीत कोणते वचन दिले होते हेही यांना आठवत नाही. गोमूत्रधारी हिंदुत्व, बुरसटलेले हिंदुत्व अंगिकारणारी ही मंडळी यांना आंबेडकरांनी दिलेले संविधान मान्य नाही. त्यामुळेच त्यांचा त्रागा सुरू आहे. निवडणूक आयोगाच्या माध्यमातून, विविध शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून विरोधकांवर दबाव आणला जात आहे. याद राखा इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर गाठ आमच्याशी आहे अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी यावेळी शासकीय यंत्रणांनाही सज्जड दम दिला.

### निर्यातबंदीमुळे शेतकरी मेटाकुटीला

चाय पे चर्चा करण्याची मोदींना मोठी हौस आहे त्यापेक्षा यंत्रणा वापरून दरोडे घालण्यात मश्गुल असलेल्या केंद्र सरकारने स्वतःच्या कामावर चर्चा करावी. मागील अडीच वर्षात आपण केलेल्या कामांमुळे महाराष्ट्रातील जनता आज खंबीरपणे आपल्या पाठीशी उभी आहे आणि या निवडणुकीत त्याचा प्रत्यय आल्याखेरीज राहणार नाही. मोठ्या मताधिक्याने मशाल चिन्हासमोरील बटन दाबून ओम राजेनिंबाळकर यांना विजयी करा असे आवाहनही ठाकरे यांनी यावेळी केले.हा कर दहशतवाद आपण नष्ट करून टाकणार असल्याचे आश्वासन उद्धव ठाकरे यांनी धाराशिव येथे दिले.महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या प्रचारार्थ धाराशिव शहरातील जिल्हा परिषद प्रशालेच्या मैदानात आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार कैलास पाटील, माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर, माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील, माजी आमदार राहुल मोटे यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.सोयाबीनला भाव नाही, कापसाच्या भावाचे वांदे झाले आहेत, तर कांदा निर्यातबंदीमुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. केवळ निर्यातबंदी केली आहे.

# मोदी पुन्हा पंतप्रधान झाल्यास हुकूमशाही!

## मला तुरुंगात जावे लागेल, सुशीलकुमार शिंदे यांचा भीतीयुक्त इशारा


। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची वाटचाल थेट हुकूमशाहीकडे होत असून ते पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यास हुकूमशाहीमुळे कोणालाही त्यांच्या विरोधात बोलता येणार नाही. जो बोलेले, त्याला अटक होईल.**

मी तर मंत्री होतो. त्यामुळे प्रथम मलाच तुरुंगात जावे लागेल, असा भीतीयुक्त इशारा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी दिला आहे.

सोलापूर लोकसभा निवडणुकीत कोळी समाजाने काँग्रेसला दिलेल्या पाठिंब्यानंतर विजापूर रस्त्यावरील माशाळ वस्तीत समाजाचा मेळावा पार पडला. त्यावेळी शिंदे बोलत होते. ते म्हणाले, दहा वर्षांपूर्वी नरेंद्र मोदी यांच्यावर जनतेने मोठा विश्वास ठेवून आणि भूलथापांना बळी पडून त्यांच्या हाती सत्ता सोपविली होती. परंतु मोदी यांना आता सत्तेची चटक लागली आहे. यंदाची लोकसभा निवडणूक अधिक महत्वाची असून हुकूमशाही विरुद्ध लोकशाहीची ही लढाई असल्याचे त्यांनी सांगितले.

शिंदे यांनी वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्यावरही टीकास्त्र सोडले. लोकसभा निवडणुकीनंतर संभाव्य चौकशी टाळण्यासाठी सुशीलकुमार शिंदे व प्रणिती शिंदे भाजपमध्ये प्रवेश करतील, असे भाकीत आंबेडकर यांनी सोलापुरात केले होते. त्यास प्रत्युत्तर देताना, प्रकाश आंबेडकरांचा बोलावता धनी कोण आहे, हे नव्याने सांगण्याची गरज नाही, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. आपण मुलगी प्रणितीसह भाजपमध्ये जाणार असल्याच्या अफवा वारंवार पसरविल्या जातात. आमचा जन्म काँग्रेससाठी झाला आहे. आम्हाला काँग्रेसने घडविले आहे. आमच्या रक्तातच काँग्रेस आहे, असा दावा त्यांनी केला. मी तर मंत्री होतो. त्यामुळे प्रथम मलाच तुरुंगात जावे लागेल, असा भीतीयुक्त इशारा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी दिला आहे. सोलापूर लोकसभा निवडणुकीत कोळी समाजाने काँग्रेसला दिलेल्या पाठिंब्यानंतर विजापूर रस्त्यावरील माशाळ वस्तीत समाजाचा मेळावा पार पडला. त्यावेळी शिंदे बोलत होते. ते म्हणाले, दहा वर्षांपूर्वी नरेंद्र मोदी यांच्यावर जनतेने मोठा विश्वास ठेवून आणि भूलथापांना बळी पडून त्यांच्या हाती सत्ता सोपविली होती. परंतु मोदी यांना आता सत्तेची चटक लागली आहे.





### मोदी यांची वाटचाल थेट हुकूमशाहीकडे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची वाटचाल थेट हुकूमशाहीकडे होत असून ते पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान झाल्यास हुकूमशाहीमुळे कोणालाही त्यांच्या विरोधात बोलता येणार नाही. प्रथम मलाच तुरुंगात जावे लागेल, असा भीतीयुक्त इशारा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी दिला आहे.सोलापूर लोकसभा निवडणुकीत कोळी समाजाने काँग्रेसला दिलेल्या पाठिंब्यानंतर विजापूर रस्त्यावरील माशाळ वस्तीत समाजाचा मेळावा पार पडला. त्यावेळी शिंदे बोलत होते.

# रेवण्णा यांना एसआयटीकडून अटक!

## कर्नाटकच्या राजकारणात मोठी खळबळ

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जेडीएसचे खासदार प्रज्वल रेवण्णा यांच्या सेक्स स्कँडल प्रकरणामुळे कर्नाटकच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. सेक्स स्कँडल प्रकरण बाहेर येताच प्रज्वल रेवण्णा हे देश सोडून फरार झाल्याची माहिती आहे. तसेच जेडीएसचे नेते एचडी रेवण्णा यांचाही या प्रकरणात सहभाग असल्याची माहिती समोर येत आहे. अशातच एचडी रेवण्णा यांच्यावर अपहरणाचा गुन्हा दाखल झाला होता. आता या अपहरण प्रकरणात एचडी रेवण्णा यांना कर्नाटक एसआयटीच्या पथकाकडून अटक करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.**



एचडी रेवण्णा यांच्या निवासस्थानी घरकाम करणारी महिला काही दिवसांपासून बेपत्ता झाल्याची तक्रार त्या महिलेच्या मुलाने दाखल केली होती. त्यानंतर एचडी रेवण्णा यांच्यावर अपहरणाचा गुन्हा दाखल झाला होता. दरम्यान, सदर महिलेचाही व्हिडीओ या सेक्स स्कँडल प्रकरणात असल्याचा संशय पोलिसांना आहे. एचडी रेवण्णा यांच्यावर अपहरणाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला होता. मात्र, न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारला. त्यानंतर एसआयटीच्या पथकाकडून एचडी रेवण्णा यांना ताब्यात घेण्यात आले. या संदर्भातील माहिती एएनआयने दिली आहे.जेडीएसचे खासदार प्रज्वल रेवण्णा यांच्यावर सेक्स स्कँडल प्रकरणात गंभीर आरोप झाल्यानंतर त्यांनी परदेशात पलायन केले. मात्र, खासदार प्रज्वल रेवण्णा हे भारतात येताच कोणत्याही क्षणी त्यांना अटक होणार असल्याची माहिती आहे. प्रज्वल रेवण्णा यांच्यावरील आरोपाचा तपास करण्यासाठी कर्नाटक सरकारकडून विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. यानंतर प्रज्वल रेवण्णा यांचा आणि त्यांच्यावरील आरोपासंदर्भातील काही माहितीचा शोध घेण्यासाठी एसआयटीचे पथक प्रज्वल रेवण्णा यांच्या बंगळुरू येथील घरी पोहोचले होते. दरम्यान, एफआयआरनुसार, सदर घटना २९ एप्रिलची आहे. बेपत्ता झालेली महिला ही एचडी रेवण्णा यांच्या होलेनारसिपुरा येथे असलेल्या फार्महाऊसवर घरकाम करत होती. गेल्या सहा वर्षांपासून सदर महिला रेवण्णा यांच्या घरी काम करत होती, असे एफआयआरमध्ये म्हटले आहे. सेक्स स्कँडल प्रकरणाचे आरोप असलेले प्रज्वल रेवण्णा यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. लैंगिक अत्याचाराचे आरोप समोर आल्यानंतर प्रज्वल रेवण्णा हे परदेशात फरार झाल्यानंतर आता केंद्रीय तपास यंत्रणा अलर्ट झाल्यानंतर प्रज्वल रेवण्णा यांच्याविरोधात ब्लू कॉर्नर नोटीस काढली जाण्याची शक्यता आहे. जेडीएसचे खासदार प्रज्वल रेवण्णा यांच्यावर सेक्स स्कँडल प्रकरणात गंभीर आरोप झाल्यानंतर त्यांनी परदेशात पलायन केले. मात्र, खासदार प्रज्वल रेवण्णा हे भारतात येताच कोणत्याही क्षणी त्यांना अटक होणार असल्याची माहिती आहे. प्रज्वल रेवण्णा यांच्यावरील आरोपाचा तपास करण्यासाठी कर्नाटक सरकारकडून विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. यानंतर प्रज्वल रेवण्णा यांचा आणि त्यांच्यावरील आरोपासंदर्भातील काही माहितीचा शोध घेण्यासाठी एसआयटीचे पथक प्रज्वल रेवण्णा यांच्या बंगळुरू येथील घरी पोहोचले होते.

### ब्लू कॉर्नर नोटीस काढली जाणार?

एचडी रेवण्णा यांच्या निवासस्थानी घरकाम करणारी महिला काही दिवसांपासून बेपत्ता झाल्याची तक्रार त्या महिलेच्या मुलाने दाखल केली होती. त्यानंतर एचडी रेवण्णा यांच्यावर अपहरणाचा गुन्हा दाखल झाला होता. दरम्यान, सदर महिलेचाही व्हिडीओ या सेक्स स्कँडल प्रकरणात असल्याचा संशय पोलिसांना आहे. एचडी रेवण्णा यांच्यावर अपहरणाचा गुन्हा दाखल झाल्यानंतर अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला होता. मात्र, न्यायालयाने अटकपूर्व जामीन नाकारला. त्यानंतर एसआयटीच्या पथकाकडून एचडी रेवण्णा यांना ताब्यात घेण्यात आले. या संदर्भातील माहिती एएनआयने दिली आहे. जेडीएसचे खासदार प्रज्वल रेवण्णा यांच्यावर सेक्स स्कँडल प्रकरणात गंभीर आरोप झाल्यानंतर त्यांनी परदेशात पलायन केले. मात्र, खासदार प्रज्वल रेवण्णा हे भारतात येताच कोणत्याही क्षणी त्यांना अटक होणार असल्याची माहिती आहे. प्रज्वल रेवण्णा यांच्यावरील आरोपाचा तपास करण्यासाठी कर्नाटक सरकारकडून विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. यानंतर प्रज्वल रेवण्णा यांचा आणि त्यांच्यावरील आरोपासंदर्भातील काही माहितीचा शोध घेण्यासाठी एसआयटीचे पथक प्रज्वल रेवण्णा यांच्या बंगळुरू येथील घरी पोहोचले होते.

# कांद्यावरील निर्यातबंदी अखेर हटवली!

## कांदा निर्यातीवर 40 टक्के शुल्क लावून निर्यातीला परवानगी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कांदा निर्यातीवर गेल्या काही काळापासून बंदी लावल्यानंतर कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. विशेषतः महाराष्ट्रातील उत्तर महाराष्ट्रात कांद्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. नाशिक, दक्षिण अहमदनगर या दोन लोकसभा मतदारसंघात कांदा निर्यातीचा महत्त्वाचा प्रश्न होता. दोन टप्प्याचे मतदान झाल्यानंतर केंद्र सरकारने अखेर शुक्रवारी (३ मे) कांदा निर्यातीवरील बंदी हटविण्याचा निर्णय घेतला.**

कांदा निर्यातीवर आता ४० टक्के शुल्क लावून निर्यातीला परवानगी देण्यात आली आहे. तसेच ३१ मार्च २०२५ पर्यंत देशी चण्याच्या आयातीवरील शुल्कात सूट दिली आहे.केंद्र सरकारच्या निर्णयाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केले. एक्सवर प्रतिक्रिया देताना ते म्हटले, “कांदा निर्यात बंदी संपूर्णतः मागे घेण्याचा निर्णय घेतल्याबद्दल मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे अनेकानेक आभार. केंद्र सरकारने काल रात्री याबाबतची अधिसूचना जारी केली. महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांना याचा मोठा लाभ मिळणार आहे. सरसकट निर्यातीला परवानगी देतानाच कांदा उत्पादकांना चांगला भाव मिळावा, याचीही काळजी घेण्यात आली आहे.”



दिंडोरीच्या भाजपाच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली. तसेच ४० टक्के शुल्क का आणि कसे लावले गेले? याचाही खुलासा केला. त्या म्हणाल्या, विरोधकांना कांदा निर्यातबंदीचा निर्णय मागे घेतला, हे मान्य होत नाही. कांद्याला चांगला दर मिळेल, शेतकऱ्यांच्या खिशात पैसे जातील, हा निर्णय केंद्र सरकार घेईल, अशी अपेक्षा विरोधकांना नव्हती. त्यामुळे त्यांचा भ्रमनिरास झाला आहे. कांदा निर्यातीवर प्रति मेट्रिक टन निर्यात शुल्क लावले गेले आहे. तसेच वेगवेगळ्या देशांसाठी वेगवेगळे शुल्क लावले आहे. पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे निर्यात खुली झाली आहे, त्याचा सर्व शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन भारती पवार यांनी केले. मागच्याच आठवड्यात केंद्र सरकारने गुजरातमधून दोन हजार टन पांढरा कांदा निर्यातीला परवानगी दिली होती. यानंतर विरोधकांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली.

### कांद्यांना योग्य दर मिळत नव्हते

त्यानंतर केंद्र सरकारने २०२३-२४ मध्ये एकूण ९९,१५० टन कांदा निर्यात झाला असल्याचे सांगितले. हे सांगत असताना केंद्र सरकारने कांदा निर्यातीवरील बंदी उठविल्याचे चित्र २८ एप्रिल रोजी रंगवले गेले होते. मात्र दुसऱ्याच दिवशी विरोधकांनी ही धूळफेक नजरेस आणून दिली.‘लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात, २० मे रोजी प्रमुख कांदाउत्पादक पट्ट्यातील धुळे, दिंडोरी, नाशिक या तीन मतदारसंघांत मतदान होणार आहे. कांदाउत्पादक मतदारांची मोठी संख्या असल्यामुळे या तीन मतदारसंघांत महायुतीला फटका बसू नये, म्हणून केंद्र सरकारने गेल्या वर्षभरात किती कांद्याच्या निर्यातीला परवानगी दिली

# गौरव मोरेचा नवा लूक

'फिल्टरपाड्याचा बच्चन' म्हणून ओळखला जाणारा अभिनेता आणि विनोदवीर म्हणजेच गौरव मोरे. 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कॉमेडी शोमधून गौरव मोरेने प्रेक्षकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले. 'बाळकडू', 'संजू', 'विकी वेलिंगकर' आणि आता 'बॉईज ४' अशा चित्रपटांमध्ये वेगवेगळ्या भूमिका साकारत गौरवने वेळोवेळी स्वत:ला सिद्ध केले आहे.गौरव सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असतो. अभिनय क्षेत्रातील अनेक गोष्टी, किस्से तो चाहत्यांबरोबर शेअर करत असतो. गौरव सध्या 'मॅडनेस मचाएंगे' या हिंदी कॉमेडी शोमधून प्रेक्षकांचं मनोरंजन करतोय. नुकताच त्याचा 'भुलभुलैया' चित्रपटातील छोटे पंडितचा लूक सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. अशातच गौरवने त्याचा नवीन लूक सोशल मीडियावर शेअर केला आहे. गौरवचा हा अवतार पाहून त्याला ओळखणं फारच कठीण आहे.'बाहुबली' या सुप्रसिद्ध चित्रपटात मुख्य भूमिकांसोबतच खलनायकाची म्हणजे 'कालकेय'ची भूमिकाही प्रचंड गाजली होती. कालकेय एकूण त्याच्या लूकमुळे आणि भाषेमुळे प्रेक्षकांच्या चांगलाच लक्षात राहिला. याचीच भूमिका आता गौरव मोरे 'मॅडनेस मचाएंगे' या कॉमेडी शोमध्ये करणार असल्याचं या लूकमुळे दिसून येतंय. मोठे केस, शरीरावर रक्त आणि मार लागल्याच्या खुणा, पोशाख अगदी पात्रासारखाच, एक खोटा डोळा अशाप्रकारचा पेहराव गौरवने या फोटोमध्ये केला आहे.गौरवचा हा फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होतोय. या फोटोवर चाहत्यांच्या भरभरून कमेंट्स आल्या आहेत. अभिनेत्री नम्रता रुद्राज कमेंट करत म्हणाली, कडक गौऱ्या. एका चाहत्याने कमेंट करत विचारलं, "भाई बाहुबली-३ मध्ये रोल मिळाला का?"

# व्यसनाच्या आहारी जाणार होतो : अध्ययन

सध्या सगळीकडे संजय लीला भन्साळी यांच्या 'हिरामंडी: द डायमंड बझार' या वेबसिरीजची चर्चा आहे. या वेबसिरीजमध्ये शेखर सुमन आणि अध्ययन सुमन ही पिता-पुत्राची जोडी पहिल्यांदाच एकत्र काम करतेय. या सिरीजमध्ये अध्ययन झोरावर अली खान ही भूमिका साकारतोय. बऱ्याच काळाने अध्ययन प्रेक्षकांच्या भेटीस आला आहे. नुकत्याच एका दिलेल्या मुलाखतीमध्ये त्याने जेव्हा त्याच्याकडे कोणताही सिनेमा नसताना त्याची अवस्था कशी होती हे शेअर केलं.नुकतीच अध्ययनने इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या मुलाखतीमध्ये अध्ययनने त्याला आलेले अनुभव शेअर केले. आपल्या करिअरमधील कठीण काळ सांगताना तो म्हणाला कि, त्याला त्याच्या करिअरच्या सुरुवातीला खूप यश मिळालं पण त्यानंतर बराच काळ त्याच्या हातात कोणतंही काम नव्हतं. तो एक असा काळ होता ज्यावेळी तो स्वतःला खूप कमजोर समजत होता. काम मिळत नसल्यामुळे त्याने जवळजवळ हार मानली होती. संजय लीला भन्साळी यांच्या वेबसिरीजमध्ये काम केल्यानंतर तो खूप खुश असून यानंतर त्याला आणखी काम मिळेल आणि अभिनेता म्हणून त्याला प्रेक्षक ओळखतील अशी आशा त्याने यावेळी व्यक्त केली.ज्यावेळी अध्ययनच्या हातात काम नव्हतं त्यावेळी तो पूर्णवेळ घरी बसून होता. हा अनुभव सांगताना तो म्हणाला कि, "मला असं वाटायचं कि मी माझ्या चार मजली आलिशान पेंटहाऊसमध्ये कैद आहे. मला उत्तम काम करून स्वतःच्या आणि आई-बाबांच्या डोळ्यात त्याच्याविषयी अभिमान दिसेल असं माझं स्वप्न होतं.

# मृणाल ठाकूरचा साधेपणा



मराठमोळ्या मृणाल ठाकूरने आपल्या दमदार अभिनयाने हिंदीसह दाक्षिणात्य सिनेसृष्टीत एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे मृणालचा चाहता वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. मृणालने आपल्या अभिनयासह सौंदर्याने देखील प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. म्हणूनच मृणालचा कुठलाही फोटो किंवा व्हिडीओ असो तो व्हायरल होतं असतो. सध्या मृणाल तिच्या 'द फॅमिली स्टार' चित्रपटामुळे चर्चेत आहे. ५ एप्रिलला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात मृणालसह अभिनेता विजय देवरकोंडा झळकला आहे. या चित्रपटातीलया गाण्याने सगळ्यांचं थिरकायला भाग पाडलं. मृणाल व विजयचा हा चित्रपट ॲमेझॉन प्राइमवर प्रदर्शित झाला आहे. अशातच सध्या मृणाल ठाकूरच्या इन्स्टाग्राम स्टोरीने सगळ्यांचं लक्ष वेधलं आहे.अभिनेत्री मृणाल ठाकूरने काही तासांपूर्वी इन्स्टाग्राम स्टोरीवर काही व्हिडीओ शेअर केले आहेत. ज्यामध्ये ती चाहत्यांना आईने डब्यात दिलेले पदार्थ दाखवताना दिसत आहे. एका डब्यात मृणालच्या आईने लाह्या दिल्या आहेत. तर दुसऱ्या डब्यात फोडणी दिलेल्या गव्हाच्या लाह्या दिल्या आहेत. या व्हिडीओमध्ये मृणाल म्हणतेय, "जेव्हा आई डबा पाठवते तेव्हा...आमच्याकडे याला काय म्हणतात बरं सांगा?...याला म्हणतात लाह्या म्हणजेच पॉपकॉन." दुसऱ्या व्हिडीओमध्ये मृणाल गव्हाच्या लाह्या किती कुरमुरीत आहेत.

# धार्मिक मूर्ती घराबाहेर फेकल्या होत्या ?

अभिनेता शेखर सुमन सध्या संजय लीला भन्साळी यांच्या 'हीरामंडी' सीरिजमुळे चर्चेत आहेत. त्यांनी नुकतंच आयुष्यातील एका कठीण काळाबद्दल सांगितलं. त्यांच्या मुलाचं ११ व्या वर्षी एका दुर्मिळ आजाराने निधन झालं होतं. त्याचं नाव आयुष होतं आणि तो त्यांचा मोठा मुलगा होता. मुलाची प्रकृती गंभीर असूनही एका दिग्दर्शकाने त्यांना शूटिंगसाठी बोलावलं होतं, त्यावेळी आजारी मुलाने आपला हात पकडून न जाण्याची विनंती केली होती, तो प्रसंग शेखर सुमन यांनी सांगितला. मुलाच्या मृत्यूनंतर घरातील सर्व मूर्ती फेकून दिल्या होत्या, असा खुलासा त्यांनी केला.चमत्कार कधीच होत नाहीत," असं कनेक्ट एफएम कॅनडाला दिलेल्या मुलाखतीत शेखर म्हणाले. त्यांनी एक प्रसंग सांगितला जेव्हा मुलगा आजारी असताना त्यांना दिग्दर्शकाने शूटिंगला बोलावलं होतं. "एके दिवशी मुसळधार पाऊस पडत होता आणि आयुष खूप आजारी होता. माझ्या मुलाची अवस्था गंभीर होती, ती परिस्थिती समजून घेत दिग्दर्शकाने मला दोन-तीन तास शूटिंगसाठी येण्याची विनंती केली होती. मी नकार दिला, पण तो म्हटला की त्याचं खूप नुकसान होईल. मग मी त्याला होकार दिला. मी निघणार होतो तेवढ्यात आयुषने माझा हात धरला आणि म्हणाला, 'पप्पा, आज नका जाऊ, प्लीज'. पण मी त्याचा हात सोडवला आणि त्याला वचन दिलं की मी लवकरच परत येईन, तो क्षण मी कधीच विसरू शकत नाही," असं शेखर सुमन म्हणाले. आयुषच्या निधनानंतर देवावरचा विश्वास उडाला होता आणि आपण घरातील मंदिर बंद केलं होतं, असं शेखर यांनी सांगितलं. "मी सर्व धार्मिक मूर्ती काढून घराबाहेर फेकल्या व मंदिर बंद केलं होतं. मी म्हणायचो की ज्या देवाने मला एवढं दु:ख दिलं, माझ्या सुंदर व निरागस मुलाचा जीव घेतला, त्या देवाकडे मी कधीच जाणार नाही," असं शेखर म्हणाले. आयुष आजारी असताना त्याचा त्रास इतका वाढला होता की त्याच्या निधनासाठी शेखर सुमन यांची पत्नी प्रार्थना करायची. या दुःखातून आपण अजुनही सावरलो नसून आयुषची आठवण येते, असं शेखर सुमन यांनी सांगितलं.१९८९ मध्ये मुलगा आजारी आहे हे कळाल्यावर शेखर यांच्या आयुष्यात खूप अडचणी आल्या होत्या. त्यावेळी करिअर, आयुष्य, कुटुंब अगदी सगळं संपल्यासारखं वाटत होतं. एकेदिवशी मुलगा सोडून जाणार हे माहित असूनही मी प्रत्येक दिवस त्याच्यासोबत घालवायचो, असं त्यांनी सांगितलं.

# दबाव नसतानाही लग्न करण्याचं कारण?



फॅशन आयकॉन मलायका अरोरा सोशल मीडियावर खूप चर्चेत असते. अवघ्या विशीत ती अभिनेता अरबाज खानला भेटली आणि त्याच्या प्रेमात पडली. मग दोघांनी लग्न केलं पण लग्नाच्या १९ वर्षांनंतर दोघे विभक्त झाले. आता एका मुलाखतीत मलायकाने घटस्फोटाचा निर्णय कसा घेतला याबद्दल सांगितलं आहे. इतकंच नाही तर पोटगीचा उल्लेख करत लोकांनी किती वाईट कमेंट्स केल्या, तो प्रसंगही सांगितला. 'पिंकविला'ला दिलेल्या एका मुलाखतीत, मलायकाने तिच्या कुटुंबाकडून कोणताही दबाव नसतानाही २५ व्या वर्षी लग्न करण्यामागचं कारण सांगितलं. "मी अशा कुटुंबात वाढले नव्हते, जिथे 'अरे तुला या वयात लग्न करावं लागेल' असं म्हटलं गेलं. मला हवं तसं आयुष्य जगण्यास सांगितलं होतं. बाहेर जा, जीवनाचा आनंद घे, नवनवीन लोकांना भेट आणि रिलेशनशिपमध्ये राहा, असं सांगण्यात आलं होतं. इतकी मोकळीक असूनही माझ्या डोक्यात काय विचार आले ते मला माहित नाही, मी २२-२३ वर्षांचे असताना म्हणाले की मला लग्न करायचं आहे. माझ्यावर कोणीही लग्नासाठी दबाव आणला नाही पण मला तेच करायचं होतं, कारण त्या क्षणी माझ्याकडे हा सर्वोत्तम पर्याय होता," असं मलायका म्हणाली.मलायकाने कबूल केलं की लग्न झाल्यानंतर अनेक वर्षांनी तिला हे समजलं की तिला आयुष्यात हेच हवं नव्हतं. "जेव्हा मी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला, तेव्हा मला वाटत नाही की इंडस्ट्रीमध्ये खूप महिला घटस्फोट घेत होत्या आणि आयुष्यात पुढे जात होत्या. मला माझ्यासाठी, माझ्या वैयक्तिक वाढीसाठी, मला माझ्या मुलाला आनंदी ठेवण्यासाठी, मुलाने आयुष्यात काहीतरी करावं यासाठी घटस्फोट हा योग्य पर्याय वाटला, तर मी तेच केलं," असं मलायका म्हणाली.घटस्फोटाकडे लोक तुच्छतेने पाहतात, असंही तिने नमूद केलं. "घटस्फोटानंतर माझ्या आजूबाजूच्या कोणालाही आनंदी करण्यासाठी मी स्थिर आणि आनंदी वाटणं गरजेचं होतं, कारण त्याची सुरुवात माझ्यापासून होते आणि मी तेच केलं," असं मलायकाने नमूद केलं. मलायका सोशल मीडियावर खूप लोकप्रिय आहे. मलायकाने सांगितलं की एकदा तिने परिधान केलेल्या एका ड्रेसची किंमत असलेली बातमी छापून आली होती, त्यावर खूप वाईट कमेंट्स होत्या. 'इतका महाग ड्रेस मलायकाला परवडू शकतो कारण तिला पोटगीत खूप पैसे मिळाले आहेत,' अशी एक कमेंट होती. ती पाहून मला धक्का बसला. या कमेंट्स पाहून मला इतकंच वाटलं की तुम्ही आयुष्यात कोणत्याही स्तरावर काहीही केले तरी त्याचा काही फरक पडत नाही, असं ती म्हणाली.फॅशन आयकॉन मलायका अरोरा सोशल मीडियावर खूप चर्चेत असते. अवघ्या विशीत ती अभिनेता अरबाज खानला भेटली आणि त्याच्या प्रेमात पडली. मग दोघांनी लग्न केलं पण लग्नाच्या १९ वर्षांनंतर दोघे विभक्त झाले.

# आरसीबीचा मुंबई इंडियन्सला मोठा धक्का!

## 13.4 षटकांत 148 धावांचे लक्ष्य गाठत मिळवला विजय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आरसीबीने घरच्या मैदानावर मोठा विजय मिळवत गुजरातचा ४ विकेट्सने पराभव केला. गुजरातला पराभूत केल्यानंतर आरसीबीने १०व्या क्रमांकावरून थेट सातव्या क्रमांकावर झेप घेतली आहे आणि प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आशांना जिवंत ठेवले आहे. तर आरसीबीने हा सामना जिंकत मुंबईला धक्का दिला आहे, मुंबई इंडियन्सचा संघ आता गुणतालिकेत शेवटच्या स्थानी पोहोचला आहे. आरसीबीच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर फाफ डू प्लेसिसच्या नेतृत्त्वाखाली संघाने यंदाच्या मोसमातील सर्वात उत्कृष्ट कामगिरी केली आहे. विराट कोहली आणि फाफच्या फलंदाजीने संघाला एक जबरदस्त सुरूवात करून दिली. या दोघांनी आरसीबीसाठी पॉवरप्लेमध्ये ९२ धावांची सर्वात मोठी भागीदारी रचली.**




नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि हा निर्णय संघाच्या पथ्यावर पडला. आरसीबीच्या गोलंदाजांनी शानदार गोलंदाजीचे प्रदर्शन दाखवत गुजरातच्या फलंदाजांना फार काळ टिकू दिले नाही. गुजरातने दिलेल्या १४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना विराट आणि फाफ डू प्लेसिसने सर्वाधिक ९२ धावांची भागीदारी रचली. फाफने आरसीबीसाठी दुसरे सर्वात जलद अर्धशतक झळकावले. फाफने २३ चेंडूत ३ षटकार आणि १० चौकारांच्या मदतीने ६४ धावा केल्या. तर विराटने २७ चेंडूत ४ षटकार आणि २ चौकारांच्या मदतीने ४२ धावा केल्या. यानंतर विल जॅक्स, रजत पाटीदार, ग्लेन मॅक्सवेल आणि कॅमरून ग्रीन यांनी झटपट विकेट गमावल्याने आरसीबीला लागोपाठ ४ धक्के बसले.या सामन्यात दिनेश कार्तिक पुन्हा एकदा आरसीबीसाठी तारणहार ठरला. दिनेश कार्तिक आणि स्वप्नील सिंग यांनी मैदानावर टिकून राहत संघाला विजय मिळवून दिला. कार्तिकने १२ चेंडूत ३ चौकारांसह २१ धावा केल्या, तर स्वप्निलने ९ चेंडूत १ षटकार आणि २ चौकारांसह १५ धावा केल्या. गुजरातकडून जोशुआ लिटीलने सर्वाधिक ४ विकेट्स घेत आरसीबीला घाम फोडला होता. तर नूर अहमदने दोन विकेट्स मिळवल्या.तत्पूर्वी गुजरातने प्रथम फलंदाजी करताना सर्वबाद १४७ धावा केल्या. आरसीबीच्या गोलंदाजीपुढे गुजरातच्या फलंदाजांनी तर पार गुडघे टेकले. एकाही फलंदाजाला फार काळ मैदानावर टिकू दिले नाही. गुजरातच्या एकाही फलंदाजाने ४० धावांचा आकडा गाठला नाही. यासह गुजरातने ३ बाद २३ धावांसह आयपीएल २०२४ मधील पॉवरप्लेमधील सर्वात कमी धावसंख्या केली आहे. जीटीचे पहिले तीन फलंदाज साहा, गिल आणि साई अनुक्रमे १,२ आणि ६ धावा करून बाद झाले. त्यानंतर आलेल्या शाहरूख खान (३७) आणि डेव्हिड मिलरने (३०) संघाचा डाव सावरला, पण मोठी धावसंख्या गाठू शकले नाही. त्यानंतर राहुल तेवतियाने २१ चेंडूत १ षटकार आणि ५ चौकारांसह ३५ धावा केल्या. तर राशीद खान(१८), विजय शंकर (१०) हे झटपट बाद झाले. तर अखेरच्या षटकात मानव सुतार, मोहित शर्मा (धावबाद) आणि नूर अहमद हे शेवटच्या षटकातील पहिल्या तीन चेंडूवर बाद झाले. मोहित शर्मा धावबाद झाल्याने विजयकुमार वैशाखची हॅटट्रिक मात्र चुकली. आरसीबीकडून सिराज, यश दयाल आणि विजयकुमार वैशाख यांनी प्रत्येकी २ विकेट मिळवले. तर कर्ण शर्माला एक विकेट मिळवण्यात यश आले.आयपीएल २०२४ मधील ५२वा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात खेळवला गेला. आरसीबीने १३.४ षटकांत हा सामना आपल्या नावे केला. या सामन्यात आरसीबीचा कर्णधार फाफ डुप्लेसिसने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो संघासाठी खूप प्रभावी ठरला. आरसीबीच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी करत गुजराचतच्या फलंदाजांवर अंकुश ठेवला. दरम्यान, बंगळुरूचा स्टार फलंदाज विराट कोहलीने अप्रतिम क्षेत्ररक्षण केले. त्याने गुजरात टायटन्सचा फलंदाज शाहरुख खानला रॉकेट थ्रोसह धावबाद केले.

### कोहलीचा भन्नाट रॉकेट थ्रो

**विराट कोहली चेंडूच्या दिशेने येत असल्याचे शाहरूखने न पाहताच तो धाव घेण्यासाठी निघाला. पण विराट कोहलीच्या वेगवान थ्रोपासून तो वाचला नाही आणि धावबाद झाला. इतकंच नाही तर शाहरुख धाव घेत असताना मागे वळून पाहत राहुल तेवतिया त्याला काहीतरी बोलताना दिसला. तेवतिया त्याला सांगत होता आधी पुढे बघ पण तोवर विराटच्या रॉकेट थ्रोने त्याचा त्रिफळा उडवला होता. तर शाहरुख खानने २४ चेंडूत ५ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने ३७ धावा केल्या. विराटच्या या रॉकेट थ्रोवर ग्रीनची प्रतिक्रियाही भन्नाट होती. ज्याचा व्हीडिओही सध्या व्हायरल होत आहे.नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या गुजरात टायटन्सची फलंदाजी पूर्णपणे फ्लॉप झाली.**

# मुंबई इंडियन्सवर भडकला विरेंद्र सेहवाग!

## पंड्या-सपोर्ट स्टाफसह खेळाडूंवर कठोर कारवाईची केली मागणी

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोलकाताने केलेल्या पराभवानंतर मुंबईचा संघ प्लेऑफच्या शर्यतीतून जवळपास बाहेर पडला आहे. मुंबईने ११ सामन्यात आठ सामने गमावले आहेत आणि केवळ ३ सामने जिंकण्यात यश आले होते. पंड्याच्या नेतृत्त्वाखालील मुंबईची कामगिरी यंदाच्या मोसमात फारच सुमार दर्जाची राहिली आहे. मुंबईच्या कामगिरीवर अनेक दिग्गजांनी खडे बोल सुनावले आहेत. पण सेहवागने तर मुंबईच्या संघातील सपोर्ट स्टाफ आणि कर्णधारावर कारवाई केली पाहिजे, असं मुंबईच्या संघ व्यवस्थापनाला सुचवलं आहे.**



त्याचसोबत खूपच तिखट शब्दात संघाच्या फलंदाजीवर वक्तव्य केले आहे.सेहवागने क्रिकबझशी बोलताना पंड्याच्या फलंदाजी क्रमाकडे लक्ष वेधले. सेहवागने सांगितलं की, जेव्हा पंड्या गुजरात टायटन्स संघात खेळायचा तेव्हा तो नेहमी चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला उतरत असे. त्याचसोबत पंड्या आणि डेव्हिडसारखे खेळाडू फलंदाजीसाठी ७व्या आणि ८वया क्रमांकावर उतरतात, याबाबत आश्चर्य व्यक्त केले आणि फारच तिखट शब्दात त्यांचे कान टोचले. सेहवागने संघमालकांना गंभीर प्रश्न उपस्थित करण्याचे आवाहन केले आणि फलंदाजीच्या क्रमवारीतील अशा मोठ्या बदलांमागील स्पष्टीकरण मागितले पाहिजे असे सुचवले.पंड्या आणि डेव्हिडच्या फलंदाजी क्रमाबद्दल बोलताना सेहवाग म्हणाला, हार्दिक पांड्या गुजरातचा कर्णधार असताना सातत्याने चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करत होता. मग मुंबई इंडियन्समध्ये आल्यावर काय झालं? अनुभवी खेळाडू इतक्या उशिरा आणि खालच्या फळीत फलंदाजीला येत आहेत हे पाहून मी हैराण आहे. संघ व्यवस्थापनाने खेळाडूंवर कठोर कारवाई करत त्यांना जाब विचारला पाहिजे की नेमकं काय चाललंय किंवा फलंदाजी क्रम का बदलला गेला आहे.

### इतके वाईट खेळाडू आहेत का?

याबद्दल खेळाडूंनी बोललं पाहिजे. संघाचा कर्णधार, फलंदाजी प्रशिक्षक, गोलंदाजी प्रशिक्षक आणि सपोर्ट स्टाफ सर्वांचीच इथे चूक आहे. संघमालकांनी कठोर भूमिका घेण्याची गरज आहे.पंड्या आणि डेव्हिडला उशिरा फलंदाजीला पाठवण्याबाबद बोलताना सेहवाग म्हणाला, केकेआरने आंद्रे रसेलला अखेरच्या षटकांसाठी वाचवून ठेवले पण तो फक्त दोन चेंडू खेळून बाद झाला. मुंबई इंडियन्सने हार्दिक पंड्या आणि टीम डेव्हिडला उशिरा फंलदाजीसाठी पाठवले. हे करून तुम्ही का साध्य केलं? बरेच चेंडू बाकी होते, आणि विकेटही पडले होते. तुम्ही एकतर लवकर फलंदाजीला यायला हवं होतं आणि सामना लवकर संपवायला हवा होता. पुढे सेहवाग म्हणाला, मला कळतं नाहीय की धावांचा पाठलाग करताना यांना नेमकं काय होतं.